POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक  कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२८५ ● मुंबई, शनिवार, १७ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात महायुतीला ब्रेक? सीएम फडणवीसांचं मोठं विधान

■मुंबई । प्रतिनिधी :

येत्या चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घ्या असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर राज्यातील सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. इतकंच नाही तर निवडणूक आयोगाने सुद्धा नवीन प्रभाग रचना करा असे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. त्यानुसारच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक बैठक घेतली. काल रात्री पुण्यात मुक्कामी असताना देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका निवडणुकीच्या तयारी संदर्भात ही महत्त्वाची अनौपचारिक बैठक बोलावली होती. या बैठकीला पुणे भाजपचे नवनिर्वाचित शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह शहरातील पदाधिकारी उपस्थित होते.

- पुण्यात महायुतीला ब्रेक लागण्याची चिन्हे?
- पुणे मनपा भाजप स्वबळावर किंवा शिंदेना सोबत घेऊन लढणार?
- पुण्यात अजितदादांच्या राष्ट्रवादीला सोबत घेणं अडचणीचं ठरण्याची शक्यता
- महायुतीसाठी पुणे मनपा अपवाद ठरणार?
- फडणवीसांनी पुणे भाजपला दिलं १०५ नगरसेवकांचं टार्गेट

**पुणे मनपात एकूण १६६ जागा**

यावेळेस देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महापालिकेत भाजपचा परफॉर्मन्स कसा आहे, निवडणुकीच्या संदर्भात पक्षाची तयारी कशी आहे या संदर्भात सविस्तर आढावा पदाधिकाऱ्यांकडून घेतला. या बैठकीमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी पुण्याचा पुढचा महापौर हा भाजपचाच होणार असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांसमोर व्यक्त केला आहे. तर, आपल्या १०५ जागा भाजपकडे कायम राहणार आहेत. थोडक्यात गेलेल्या जागांवर महायुतीमध्ये चर्चा केली जाईल. आपण महायुती म्हणून लढण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करू. तर निवडणुका २०१७ च्या प्रभाग रचनेनुसारच होतील असं फडणवीस या बैठकीत पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हणाले आहेत.



२०१७ साली झालेल्या निवडणुकीत भाजपचे १०० नगरसेवक निवडून आले होते. त्यानंतर काही दिवसांपूर्वी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पाच नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे या १०५ जागांवर भाजपने निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच दावा ठोकला आहे. त्यामुळे जरी पुण्यामध्ये महायुतीची चर्चा झाली तर या १०५ जागा सोडून पुढील जागांवर चर्चा करण्यात येईल असा सूचक इशाराच देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांना दिला आहे. त्यामुळे संभाव्य १६६ नगरसेवकांपैकी निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच १०५ जागांवर भाजपने दावा ठोकल्यामुळे अजित पवारांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना यांना हा फॉमुर्ला मान्य असणार का? यावर पुण्यातील संभाव्य महायुतीचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

**ते अपवादात्मक ठिकाण पुणे असणार?**

कालच पुण्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती म्हणून निवडणुका लढण्याचा आमचा प्रयत्न आहे. मात्र, काही ठिकाणी अपवाद असू शकतात. त्या ठिकाणी आमच्यात समजुतीनुसार वेगळी भूमिका घेऊ. एकमेकांवर टीका न करता, जास्तीत जास्त ठिकाणी आम्ही एकत्र लढणार आहोत, असं म्हटलं होतं. त्यानंतर पुण्यात मुक्कामी असणाऱ्या फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना १०५ जागांवर तयारी करण्याचे आदेश दिल्यानंतर आता फडणवीसांचा हा फॉम्युर्ला महायुतीतील इतर घटक पक्षांना मान्य होणार?, की जसं फडणवीस म्हणाले होते की अपवादात्मक ठिकाणी एकत्र लढता येणार नाही त्यानुसार हे अपवादात्मक ठिकाण पुणे असणार याकडे राज्याचे लक्ष लागलंय.

### राज्याला मिळणार नवं मंत्रालय... ११० कोटींच्या खर्चातून उभारणार सुसज्ज दालनं

राज्याच्या राजकारणाचा आणि संपूर्ण राज्याचा कारभार जिथून चालतो अशा मंत्रालयाचा उल्लेख कैक कारणांनी होत राहतो. मंत्रीमहोदयांपासून ते अगदी सामान्य नागरिकांची इथं ये-जा असते. अनेकांच्या मागण्या इथूनच पूर्ण होतात, कैक आदेश इथून पारित केले जातात आणि इथंच मंत्रीमंडळाच्या काही महत्त्वाच्या बैठका आणि नेतेमंडळींच्या भेटीगाठीसुद्धा पार पडतात. महाराष्ट्राच्या राजकारणात अनन्यसाधारण महत्त्वं असणाऱ्या याच मंत्रालयासंदर्भात एक मोठी माहिती समोर आली आहे.

मंत्रालयासाठी आता नवी सहइमारत

मागील काही वर्षांपासून मंत्रालयाच्या पुनर्विकासाचा प्रकल्प रखडलेला असला तरीही आता मात्र त्यात लक्ष दिलं जात असून, मंत्रालयासाठी नवी सहइमारत उभारली जाणार आहे. २० मंत्र्यांसाठी तब्बल ११० कोटींचा खर्च करत या इमारतीमध्ये आधुनिक अन् सुसज्ज दालनं बनवण्यात येणार आहे.

**कुठे असेल ही मंत्रालयाची नवी इमारत?**

सध्या मंत्रालय आहे त्याच इमारतीला लागून लागूनच मंत्रालय ॲनेक्सची पाच मजली नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. यासाठी साधारम ११० कोटी रुपये इतका खर्च येणार असून या इमारतीत सुसज्ज दालनं तयार केली जाणार आहेत. नव्या इमारतीचं बाह्यस्वरूप सध्याच्या मंत्रालय इमारतीशी सुसंगत असणार आहे ही लक्षात घेण्याजोगी बाब.

सध्याच्या घडीला काही मंत्र्यांना विधानभवनात, तर काही कॅबिनेट आणि राज्यमंत्र्यांना मंत्रालयाच्या विस्तारित इमारतीच्या सातव्या मजल्यावर जागा देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह सध्या ४० मंत्री आहेत त्यामुळं या मंत्र्यांपैकी काहींना मंत्रालयाच्या नव्या इमारतीत दालन दिलं जाणार आहे.

मंत्र्यांची कमाल संख्या नव्या महायुती सरकारच्या येण्यानंतर पूर्ण झाली असून, आता मंत्र्यांना मंत्रालयातून कार्यभार सांभाळण्यासाठी दालनं उपलब्ध नसल्याची बाब समोर आली आहे. प्रत्यक्षात अनेक मंत्र्यांची कार्यालयं मंत्रालयाबाहेर असल्यानं त्याचा परिणाम राज्याच्या कामकाजावर होत आहे. ज्यामुळं कारभार सुरळीत होण्यासाठी, मंत्रीमहोयदयांच्या भेटीसाठी येणाऱ्यांना पुरेशी आसनव्यवस्था असेल अशा दालनांची मागणी सातत्यानं केली जात होती. याच मागणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर मंत्रालयासाठी नव्या सहइमारतीच्या बांधकामाची जबाबदारी सोपवली.

**काय असतील नव्या इमारतीची वैशिष्ट्य?**

मंत्रालयाची नवी इमारत साधारण १०० दिवसांत बांधून पूर्ण करण्याचा मानस ठेवण्यात आला आहे. किंबहुना त्यासाठी मंत्रालयाशेजारीच असणाऱ्या उद्यानावर इमारतीचं बांधकाम हातीसुद्धा घेण्यात आलं आहे. प्राथमिक माहितीनुसार पालिकेनं इथं तळ मजला अधिक पाच अशा बांधकामास परवानगी दिल्याचं कळतं. ही संपूर्ण इमारत प्री फॅब अर्थात आधुनिक तंत्रानं सिमेंट आणि स्टीलपासून पर्यावरणपूरक निकषांवर तयार केली जाईल.

इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर मंत्र्यांना शासकीय बैठका घेण्यासाठी स्वतंत्र बैठक कक्ष असेल. तर, इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर चार मंत्र्यांची दालनं आणि कर्मचारी कार्यालय असेल.

मंत्रालयाच्या या नव्या इमारतीच्या तळ मजल्यावर इथं येणाऱ्यांसाठी चहापानाची सुविधा पुरवणारी यंत्रणा/ कॉफी हाऊस किंवा तत्सम आस्थापना असेल. तेव्हा हे नवं मंत्रालय प्रत्यक्षात कसं दिसेल आणि त्यावर विरोधकांचं म्हणणं काय हे पाहणंसुद्धा महत्त्वाचं ठरणार आहे.

---

## शिवसेना-मनसे युतीला ब्रेक?
## मराठीजनांचे 'ठाकरे पर्वा'चे स्वप्न अधुरेच

■मुंबई । प्रतिनिधी :

गेल्या काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. महापालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षात युती होऊ शकते, अशा चर्चा रंगल्या होत्या. मात्र ठाकरे बंधूंची युती लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दोन्ही ठाकरेंकडून अद्याप युतीबाबत कोणतीही बोलणी झालेली नाही, असंही बोललं जातंय. मात्र आता ही युती लांबणीवर पडली असल्याची चर्चा सुरू आहे.

ठाकरे बंधू पुन्हा एकदा एकत्रित येऊन महाराष्ट्राला ठाकरे पर्व पाहायला मिळेल, अशी आशा मनसैनिक आणि शिवसैनिकांना होती. मात्र आता ठाकरे बंधूंची युती होणार की नाही? अशा चर्चा रंगू लागल्या आहेत. राज ठाकरेंनी पुन्हा पुढाकार घ्यावा असं अवाहन त्यांना संजय राऊतांनी केलं होतं. मात्र त्यांच्या अवाहनाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे. राज ठाकरेंनी मनसैनिकांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. तसंच, युतीच्या भरवशावर राहू नका, असंदेखील राज ठाकरेंनी कार्यकर्त्यांना म्हटलं आहे.



मुंबई आगामी महापालिका निवडणूक महायुती की उद्धवसेना यांच्यासोबत लढवायची की पुन्हा एकदा स्वबळावर लढायचे याचा योग्य वेळी, योग्य निर्णय घेण्यात येईल. मात्र, सध्या युतीबाबत कोणतीही विधाने करू नका, अशा स्पष्ट सूचना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे नेते आणि पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही नेत्यांकडून युतीबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे समोर आहे. परदेश दौऱ्यावरुन दोन्हीही नेते परत आले आहेत. मात्र अद्यापही युतीच्या बाबतीत कोणत्याही हालचाली दिसत नाहीयेत. अशातच राज ठाकरेंनी आता कार्यकर्त्यांना युतीबाबतीत आता बोलू नका, अशा सूचना दिल्या आहेत. युतीबाबतचा जो काही निर्णय आहे तो आपणच घेऊ, असे आदेशदेखील राज ठाकरेंनी मनसैनिकांना दिल्या आहेत. युतीबाबतच्या चर्चांकडे लक्ष न देता आता कामाला लागा, असे स्पष्ट आदेश राज ठाकरेंनी दिले आहेत.

---

## मान्सून अरबी समद्रात दाखल... कोकणमार्गे महाराष्ट्र कधी व्यापणार मोसमी वारे?

■मुंबई । प्रतिनिधी :

होरपळवणाऱ्या उकाड्यापासून येत्या काही दिवसांतच मोठा दिलासा मिळणार असून, कारण ठरणार आहे ते म्हणजे मान्सून वाऱ्यांचं आगमन. अंदमानात दाखल झालेल्या या वाऱ्यांची सकारात्मकरित्या प्रगती झाली असून, अरबी समुद्रापर्यंत मोसमी वाऱ्यांनी मजर मारली आहे. त्यामुळं आता मान्सून खऱ्या अर्थानं केरळाच्या आणखी जवळ आल्याचं स्पष्ट होत आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार मालदीव आणि श्रीलंकेपर्यंत मान्सून पोहोचला असून, तिथं अंदमान आणि बंगालच्या उपसागरात त्यानं चांगला जोर धरला आहे. ज्यामुळं २७ मेपर्यंत मान्सून केरळात धडकून तिथं स्थिरावणार आहे. यंदाच्या वर्षी अपेक्षित १३ मे पूर्वीच मान्सूनचे वारे अंदमान आणि निकोबार बेट समुहांमध्ये दाखल झाले असून, तिथून या वाऱ्यांनी बंगलच्या उपसागरापासून अरबी समुद्र आणि श्रीलंकेच्या कोमोरिनचं क्षेत्रसुद्धा व्यापलं.



दरम्यान, मान्सून दाखल होण्यापूर्वी देशातील बहुतांश भागांमध्ये मान्सूनपूर्व पावसानं हजेरी लावली आहे. यामध्ये महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, रायलसीमा, तामिळनाडूचा समावेश आहे. तर, जम्मू काश्मीर, पंजाब, हरियाणा, मध्य प्रगेश, बिहार, आसाम आणि ओडिशामध्येसुद्धा पावसानं जोरदार हजेरी लावल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**मान्सूनच्या प्रवासात वेग...**

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार पुढील चार आठवड्यात मोसमी वारे अर्थात पावसाचा प्रवास समाधानकारक वेगानं होणार असून, येत्या चार आठवड्यांत देशात नैऋत्य मोसमी वाऱ्यांची गती वाढणं अपेक्षित आहे. ज्यामुळं वेळेपूर्वीच मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाल्याच आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. मान्सूनच्या आगमनाचं एकंदर चक्र पाहिल्यास साधारण जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तो केरळमध्ये धडकतो आणि पुढं कोकण, मध्य महाराष्ट्र करत देशाच्या उर्वरित भागांना व्यापतो. यंदा केरळतच मान्सून वेळेआधी आला, तर तो महाराष्ट्राची वेसही वेळेआधीच म्हणजेच ६ जूनपूर्वीच ओलांडू शकतो असं म्हणायला हरकत नाही.

---

## १०वीत मराठी विषयात ३८ हजार विद्यार्थी नापास
## महाराष्ट्रात मराठी भाषाच ठरतेय अवघड

■छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :

राज्य शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल लागला. निकाल चांगला लागला म्हणून सगळीकडे आनंद व्यक्त होतोय मात्र हाच निकाल आपल्यासाठी लाजिरवाणा आणि धक्कादायक आहे. ज्या महाराष्ट्राची मातृभाषा मराठी आहे, जिला अभिजात दर्जा मिळाला म्हणून सगळ्यांनी आनंद व्यक्त केला त्याच मराठीत दहावीत महाराष्ट्रातले तब्बल 38 हजार विद्यार्थी नापास झाले आहेत.

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' असं म्हणणाऱ्या महाराष्ट्रातले विद्यार्थी खरंच मराठी शिकतायेत का, असा प्रश्न पडलाय आणि त्याचं कारण म्हणजे नुकताच लागलेला दहावीचा निकाल. या निकालात राज्यात मराठी विषयात तब्बल ३८ हजार ४३७ विद्यार्थी नापास झालेत. मुंबई विभागात तब्बल ४ हजार मुलं मराठीत नापास झाली आहेत तर मराठवाड्यातल्या ८ जिल्ह्यांमध्ये तब्बल १५ हजार ११७ विद्यार्थी नापास झालेत. मराठी विषयात नापास होण्यामागे अनेक कारणं राज्य शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांनी सांगितली आहेत. त्यामुळे ही स्थिती सुधारून निकाल चांगला यावा यासाठी विद्यार्थ्यांच्या मराठी विषयावर लक्ष द्यावं लागेल, असं लातूर मंडळाचे अध्यक्ष सांगत आहेत.

इंग्रजीपेक्षाही विद्यार्थ्यांना मराठी कठीण जातंय, हे दुर्दैवी आहे. इंग्रजीपेक्षा मराठी अवघड, ३८ हजार ४३७ विद्यार्थी नापास तर इंग्रजीत ६ हजार ७३८ विद्यार्थी नापास झाले आहेत.



इंग्रजीच्या तुलनेत मराठी विषयांमध्ये नापास होणा-या विद्यार्थ्यांची टक्केवारी सहा पटीनं जास्त आहे. अनेक घरांमध्ये मराठीला दुय्यम मानतात, पालक मराठीत बोलत नाही परिणामी मराठी कठीण बनल्याचं भाषातज्ञ सांगतात. जागतिक भाषा इंग्रजी, पुढचं शिक्षणही इंग्रजीत मग मराठी शिकून फायदा तो काय, या विचारानं ही स्थिती असंही मत भाषातज्ञांकडून व्यक्त

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेवर भर असावा, असं धोरण असताना दुसरीकडे मात्र महाराष्ट्रातच मातृभाषेकडं दुर्लक्ष होतंय हे गंभीर चित्र आहे. मातृभाषेतून एखाद्या विषयाचं आकलन सहज होतं पण तीच येत नाही मग करायचं काय? मातृभाषेतच विद्यार्थी जर नापास होत असतील तर याला जबाबदार कोण? हे प्रश्न आहेत. मराठीचे ढोल पिटणाऱ्या राजकारण्यांनी आणि सर्व स्तरातल्या नागरिकांनी आता धोक्याची घंटा समजावी आणि मराठीकडे तातडीनं लक्ष द्यावं, अन्यथा येता काळ फार कठीण असेल.

---

## १०वी-१२वीच्या निकालाचा स्क्रीनशॉट स्टेटसवर ठेवणे ठरू शकते धोकादायक?

■मुंबई । प्रतिनिधी :

नुकताच दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर झाला आहे. यंदाही राज्यात मुलींनीच बाजी मारली आहे तर कोकण विभागाचा सवार्धीक निकाल लागला आहे.

निकाल लागल्यानंतर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या नातेवाईकांनी ऑनलाइन निकालाचे स्क्रीनशॉट व्हॉट्सॲपवर शेअर केले आहेत. पण विद्यार्थ्यांचे निकाल सोशल मीडियावर शेअर करणे धोक्याचे ठरू शकते. अलीकडेच सायबर तज्ज्ञांनी याबाबतचे तोटे सांगितले आहेत. त्यामुळं प्रत्येक पालकांनी हे लक्षात ठेवलेच पाहिजेत.

मुलांचा निकाल व्हॉट्सॲप स्टेटसवर किंवा इतर सोशल मीडियावर शेअर करत असाल तर वेळीच सावध व्हा. मुलांच्या कौतुकाने अनेक पालक मुलांना किती टक्के मिळाले हे सर्वांना कळावे या उद्देशाने निकालाचा फोटो सोशल मीडियावर शेअर करतात. पण यामुळं काही काळ मुलांचे कौतुक होईलदेखील पण नकळतपणे तुम्ही सायबर चोरांना मुलांचा संपूर्ण वैयक्तीक डेटा शेअर करत असतात. मुलांच्या बाबतीतील संपूर्ण माहिती ही नकळतपणे शेअर केली जाते. त्याचा वापर सायबर भामट्यांकडून केला जातो. कसं ते जाणून घेऊयात.




**राज्यात दहावीचा निकाल 94.10 टक्के**

दहावीचा एसएससी बोडार्चा निकाल यंदा 94.10 टक्के लागला इतका लागला आहे. यंदाही कोकण विभाग अव्वल 98.82 टक्के लागला असून नागपूर विभाग सर्वात कमी 90.78 टक्के इतका लागला आहे. मार्च 2024 च्या तुलनेत फेब्रु.-मार्च 2025 निकाल 1.71 टक्कांनी कमी लागला आहे. यंदाचा निकाल 1.71 टक्क्यांनी घसरला आहे. यंदा राज्यात एकूण 211 विद्यार्थ्यांना 100 टक्के गुण मिळालेत. 35 टक्के पडलेले 285 विद्यार्थी आहेत यंदा राज्यभरातून 75 टक्के पुढील विद्यार्थी 4 लाखाच्यावर आहेत.

विद्यार्थ्यांच्या निकालावर त्यांचे नाव, जन्मतारिख ते बोडार्चा सीट क्रमांक ही सगळीच वैयक्तीक माहिती असते. इतकंच नव्हे तर पालकांचे संपूर्ण नावदेखील निकालाच्या प्रतवर असते. तसंच, मुलांना किती टक्के मिळाले, कोणत्या विषयात किती गुण मिळालेत. शाळेचे नाव अशी सगळी माहिती दिलेली असती. ही सर्व माहिती सायबर चोरांसाठी महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळं सोशल मीडियावर निकाल शेअर करणे धोक्याचे ठरू शकते.

---

## बीडमध्ये भीषण अपघात
## कंटेनरनं आठ ते दहा वाहनांना चिरडलं




हा अपघात एवढा भीषण होता की, कंटेनरनं आठ ते दहा वाहनांना धडक दिली, या अपघातामध्ये या वाहनांचं प्रचंड नुकसान झालं आहे. हा अपघात नेमका काशामुळे झाला याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे, मात्र भरधाव कंटेनरवरील नियंत्रण सुटून हा अपघात झाला असावा असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

■बीड । प्रतिनिधी :

बीडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे, भीषण अपघाताची घटना घडली आहे. भरधाव वेगातील कंटेनरने आठ ते दहा वाहनांना धडक दिली, या अपघातामध्ये एक महिलेचा मृत्यू झाला असून, १५ जण जखमी झाले आहेत. ही घटना बीड जिल्ह्यातल्या केजमध्ये घडली आहे. या घटनेनंतर जमाव चांगलाच संतप्त झाला, संतप्त जमावाकडून कंटेनरला आग लावण्यात आली आहे. या घटनेमध्ये कंटेनर जळून खाक झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली, कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, बीडच्या केज शहरामध्ये भरधाव वेगातील कंटेनर चालकाने तब्बल आठ ते दहा गाड्यांना धडक दिली. या अपघातामध्ये एक महिला ठार झाली असून, १५ जण जखमी झाल्याची माहिती आहे. या अपघातामध्ये वाहनांचं देखील मोठं नुकसान झालं आहे. कंटेनर चालकानं आठ ते दहा वाहनांना धडक दिली, या अपघातानंतर कंटेनर चालकानं कंटेनरसह पळून जाण्याचा प्रयत्न केला. कंटेनर केजहून पुढे अंबाजोगाईकडे निघाला. मात्र पोलिसांनी तातडीने कारवाई करत हा कंटेनर ताब्यात घेतला आहे. या अपघातामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून, १५ जण जखमी झाले आहेत. जखमींना स्थानिकांच्या मदतीने उपचारासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

---



## पत्नी आणि लाडक्या लेकीला संपवले, नंतर नवऱ्यानेही उचललं धक्कादायक पाऊल

■उल्हासनगर । प्रतिनिधी :

उल्हासनगर येथे एक हृदयद्रावक घटना घडली आहे. एका हसत्या-खेळत्या कुटुंबाची वाताहत झाली आहे. पत्नी, मुलीची हत्या करुन एका व्यक्तीने जीवन संपवलं आहे. उल्हासनगर कॅम्पनंबर १ मध्ये ही घटना घडली आहे. आर्थिक विवंचनातून त्यांनी हे पाऊल उचलले असल्याचे समोर आले आहे. एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पत्नी ,मुलीची हत्या करून वडिलांनी जीवन संपवल्याची धक्कादायक घटना उल्हासनगर कॅम्प नंबर १ परिसरात घडलीय. आर्थिक विवेनचनातून हा प्रकार केल्याचे उघड झाले आहे. पवन पहुजा असं जीवन संपवलेल्या व्यक्तीचे नाव आहे. पवन याने सुरुवातीला पत्नी नेहा आणि मुलगी रोशनीची हत्या केली त्यानंतर स्वता राहत्या घरातच जीवन संपवलं आहे. या घटनेची माहिती उल्हासनगर पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगरच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहेत. दरम्यान, पवन याने जीवन संपवण्यापूर्वी मोबाईलमध्ये व्हिडिओ कैद करून आपण आर्थिक विवंचनातून हे कृत्य करत असल्याचे सांगितले आहे. पवन हा सोनार गल्ली परिसरात एका दुकानात कामाला होता. गुरुवारी मध्यरात्री त्याने मुलगी,पत्नी यांची हत्या करून स्वतः जीवन संपवले आहे. या प्रकरणी आता उल्हासनगर पोलीस ठाण्यात एडीआर दाखल करून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

**कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या**

घरगुती वादातून पतीने पत्नीची गळा चिरून निर्घृण हत्या केल्याची घटना उल्हासनगरच्या शांतीनगर परिसरात घडली आहे. यानंतर आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. सुरेखा आनंद सूर्यवंशी असं मयत महिलेचं नाव आहे. सुरेखा आणि तिचा पती आनंद हे शांतीनगरच्या गावडे हायस्कूल भागात वास्तव्याला होते. आनंद हा व्यसनाधीन असल्याने त्यांच्यात दररोज भांडणं होत होती. शुक्रवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास आनंद आणि त्याची पत्नी सुरेखा यांच्यात जोरदार भांडण झालं, याच रागातून आनंद याने धारधार हत्याराने सुरेखाच्या गळ्यावर गंभीर वार करून तिची हत्या केली आणि फरार झाला.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# सरन्यायाधीशपदाचे ‘भूषण’

घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या एका छोटेखानी समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूषण गवई यांना पदाची शपथ दिली. केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल तसेच रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते रा. सू. गवई यांचे सुपुत्र असलेल्या भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती जिल्ह्यात झाला. मुंबईतून कायद्याची पदवी घेतल्यानंतर १६ मार्च १९८५ रोजी ते बार कौन्सिलचे सदस्य झाले. १९८७ पर्यंत त्यांनी माजी महाधिवक्ता आणि उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिवंगत बॅरिस्टर राजा एस. भोसले यांच्यासोबत त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या कालावधीत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली. १९९० नंतर त्यांनी प्रामुख्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासाठी वकिली केली. त्यांनी संवैधानिक कायदा आणि प्रशासकीय कायदा या विषयांत प्रॅक्टिस केली. ते नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे अधिकृत वकील होते. यानंतर वकील भूषण गवई यांनी ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ या काळात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून काम पाहिले. १७ जानेवारी २००० रोजी त्यांची नागपूर खंडपीठात सरकारी वकील आणि सरकारी अधिवक्ता म्हणून नियुक्ती झाली. तर १४ नोव्हेंबर २००३ रोजी त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती मिळाली आणि १२ नोव्हेंबर २००५ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती मिळाली. भूषण गवई हे सरन्यायाधीशपदी विराजमान होणारे दुसरी मागासवर्ग समाजातील मान्यवर आहेत. यापूर्वी, २००७ साली सरन्यायाधीशपद भूषवलेले के. जी. बाळकृष्णन हेही याच समाजातील होते. बाळकृष्णन यांनी तीन वर्षे सरन्यायाधीशपद भूषवले होते. याशिवाय, भूषण गवई हे सहावी मराठी व्यक्ती ठरले आहेत. न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. शरद बोबडे, न्या. प्रल्हाद बालाचार्य गजेंद्रगडकर, न्या. उदय उमेश लळित आणि न्या. धनंजय चंद्रचूड यांच्यापाठोपाठ भूषण गवई सरन्यायाधीश झाले आहेत. भूषण गवई यांची साधी राहणी लक्ष वेधून घेणारी आहे. नवीन सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याकडून योग्य आणि योग्यवेळी न्यायदानाची अपेक्षा आहे. आतापर्यंतची त्यांची कारकीर्द पाहता, परखड निरीक्षण नोंदवतानाच, संतुलित न्यायदान केले आहे. रामशास्त्री बाण्याच्या भूषण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयात काही नवे पायंडे पाडताना, जनहित याचिकांच्या सुनावणीसाठी आठवड्यातून एक दिवस निश्चित केला. उत्तर प्रदेशातील आरोपींच्या घरांवरील बुलडोझर कारवाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत योगी आदित्यनाथ सरकारले फटकारले होते. याशिवाय, मोफत योजनांबद्दलही त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. मोफत मिळत असलेल्या सुविधांमुळे लोक काम करण्यास तयार नाहीत. त्यांना मोफत रेशन मिळते, त्यांना कोणतेही काम न करता पैसे मिळतात, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. याशिवाय, पुण्यातील एका जमीन प्रकरणाच्या सुनावणीत लाडकी बहीणसारख्या मोफत योजना बंद करण्याचा इशारा महायुती सरकारला दिला होता. आतापर्यंतच्या त्यांच्या रोखठोक आणि स्पष्ट भूमिकेमुळे विरोधकांना, विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. याआधीचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासमोर सत्तासंघर्षाची सुनावणी झाली. निकाल देताना तत्कालीन सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी निकालात ठाकरे गटाच्या दृष्टीने सकारात्मक निरीक्षणे नोंदवली होती. पण प्रत्यक्ष निकाल मात्र ठाकरे गटाला अपेक्षित नव्हता. त्यामुळे याबाबत संताप व्यक्त करत, महाराष्ट्रामध्ये घटनाबाह्य सरकारला सुप्रीम कोर्टाने संरक्षण दिल्याचा आरोपही ठाकरे गटाकडून करण्यात आला. काही महिन्यांपूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी कथितरित्या रोख रक्कम सापडली होती. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयाच्या एका न्यायाधीशांच्या वकील मुलाने याच काळात लंडन येथे ३०० कोटी रुपयांचा ‘व्हिला’ खरेदी केल्याची चर्चा रंगली होती. या पार्श्वभूमीवर भारतातील न्यायव्यवस्थेमधील पारदर्शकता वाढवणे तसेच जनतेचा विश्वास दृढ करणे या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयातील प्रत्येक न्यायमूर्तींकडे किती मालमत्ता आहे? याची माहिती काही दिवसांपूर्वी सार्वजनिक करण्यात आली आहे. त्यात तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि २० इतर न्यायमूर्तींनी आपल्याकडील मालमत्तेचा तपशील दिला आहे. त्यात विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांचाही समावेश आहे. निवृत्तीनंतर काही न्यायमूर्ती राजकीय पक्षांच्या वळचणीला गेल्याचेही मधल्या काळात पाहायला मिळाले. अशा परिस्थितीत, सरन्यायाधीशपदावरून पायउतार झाल्यानंतर कोणतेही सरकारी पद स्वीकारणार नाही, असे त्यांनी जाहीर केले आहे. सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर २०२५ रोजीपर्यंत आहे. या जवळपास सहा महिन्यांच्या काळात कोणत्याही वादग्रस्त निर्णय वा भूमिका ते घेणार नाहीत, त्याऐवजी ते एक विशेष छाप उमटवतील, अशी अपेक्षा आहे.

# सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे उत्तरदायित्व



अर्थ मंत्रालयातील सचिवांनाही आचारसंहिता लागू होते. अगदी उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांवरही महाभियोगाची तरतूद आहे. पण बँकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी मात्र कोणतीही तरतूद केलेली नाही. थोडक्यात हे आपापल्या बँकेचे अनभिषिक्त सम्राटच म्हणा ना!

के. व्ही. सुब्रमणियन हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीवर भारताचे प्रतिनिधी म्हणून एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर पद भूषविणारे, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून काम केलेले, तसेच बँकिंगमधील कॉर्पोरेट गव्हर्नन्स या विषयावर नेमण्यात आलेल्या नायक समितीचे सन्माननीय सदस्य. अशा या प्रख्यात अर्थतज्ज्ञांना भारत सरकारने एकाएकी मुदत संपण्यापूर्वीच ‘आयएमएफ’च्या एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर पदावरून हटवले आणि मायदेशी परत बोलावले. सरकारचा हा निर्णय अनेकांसाठी धक्कादायक आणि अनाकलनीय ठरला.

परंतु, लगेचच युनियन बँकेतील कर्मचारी संघटनेने त्या बँकेतील उच्चपदस्थांच्या निर्णयावरून त्यांच्या पुस्तकाच्या दोन लाख प्रती विकत घेण्याचा निर्णय घेतल्याचे प्रकरण पुराव्यासह उघडकीस आणले. त्या निर्णयासाठी बँकेने तब्बल सात कोटी रुपयांची रक्कम खर्च केल्याचे समोर आले. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात काहीशी स्पष्टता आली. समाजमाध्यमांमध्ये लगेचच या महाशयांचे पंतप्रधान, राष्ट्रपती व अर्थमंत्री यांच्यासोबत त्यांच्या पुस्तकाच्या प्रतीसह छायाचित्रे झळकू लागली आणि मग ही सगळी चर्चा सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि त्यांच्या व्यवस्थापनशैलीभोवती केंद्रित होऊ लागली, हे साहजिकच होते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे उच्चपदस्थ सरकारतर्फे नेमले जातात. सत्ताधारी पक्ष कोणताही असो, काँग्रेस असो वा भाजप; सत्तेशी जवळीक हा नियुक्तीचा मुख्य निकष ठरत असतो. त्यामुळे बँकेतील उच्चपदस्थ अशा मार्गांचा वापर करून सत्तेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. युनियन बँकेतील प्रकरणही त्याचेच उदाहरण आहे.

या प्रकरणात कर्मचारी संघटनेने मोठी जोखीम पत्करून हे प्रकरण उघडकीस आणले, पण अशी अनेक प्रकरणे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये घडत असतात, मात्र ती बाहेर येत नाहीत. हीच खरी चिंतेची बाब आहे. कारण या बँका अखेर जनतेच्या पैशाच्या विश्वस्त म्हणून काम करतात. जर तिथेच लूटमार सुरू असेल तर त्याला अटकाव कोण घालणार, हा खरा प्रश्न आहे.

देशात असा एकही नोकरशहा नाही ज्याच्यावर आचारसंहिता लागू होत नाही. अपवाद म्हणजे बँकेतील चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर आणि एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर. त्यांच्या नेमणुका करणाऱ्या अर्थमंत्रालयातील सचिवांनाही आचारसंहिता लागू होते. अगदी उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांवरही महाभियोगाची तरतूद आहे, पण बँकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी मात्र कोणतीही तरतूद केलेली नाही. थोडक्यात हे आपापल्या बँकेचे अनभिषिक्त सम्राटच म्हणाना! जर एखाद्या फौजदारी खटल्यात या उच्चपदस्थांना अटक झालीच, तर त्यांना तेवढ्यापुरते पदावरून बाजूला सारले जाते. म्हणजे हे उच्चपदस्थ अधिकारी कोणत्याच बाबतीत कोणालाच उत्तरदायी नाहीत.

या उच्चपदस्थांना फक्त त्यांच्या संचालक मंडळापुढे उत्तरदायित्व आहे. मात्र, संचालक मंडळातील ६० टक्के जागा गेल्या दहा वर्षांपासून रिकाम्या आहेत. कायद्यानुसार या जागांवर कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी, ठेवीदार, शेतकरी, सहकार, कायदा या क्षेत्रांतील प्रतिनिधींची नियुक्ती व्हायला हवी, परंतु ती झाली नाही. लोकसभेतही हा प्रश्न अनेकदा विचारण्यात आला, पण सरकारने गोलमाल उत्तरे देऊन तो टाळण्याचा प्रयत्न केला. न्यायालयातही या प्रकरणाची फाइल धूळ खात पडून आहे. याचा परिणाम म्हणून बँकांमधले उच्चपदस्थ आज अनिर्बंध सत्ता वापरत आहेत.

या रिक्त जागांमुळे बँकांतील उच्चपदस्थांकडे अमर्याद अधिकार जातात. सध्या बँकांमध्ये मॅनेजिंग डायरेक्टर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, सरकार व रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी आणि शेअरहोल्डर डायरेक्टर यांच्या नेमणुका होतात. शेअरहोल्डर डायरेक्टर म्हणून सहसा एलआयसी किंवा बँकांचे निवृत्त उच्चपदस्थ अधिकारीच नेमले जातात. हे सगळे नोकरशहा असलेले अधिकारी आपापले हितसंबंध जपत काम करतात. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतील दर दिवशी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांना अटकाव कोण घालणार आणि कसा घालणार, हाच मुख्य प्रश्न आहे.

कॉर्पोरेट गव्हर्नन्स, पारदर्शकता या संकल्पना केवळ बोलण्यापुरत्याच राहतात. सामान्य नागरिकांना या व्यवहारांची माहिती मिळणे कठीण असते. जर कोणी व्यक्तीने अथवा बँकांमधील संघटनांनी ही माहिती उघडकीस आणली तर त्यांना जबर किंमत मोजावी लागते किंवा विविध मार्गांनी त्यांचा आवाज दाबला जातो. माहितीचा अधिकार कायदा असो, वा व्हिसल ब्लोअर पॉलिसी, यांचा वापर करणाऱ्यांना बँकेतील व्यवस्थापनाकडून दडपशाहीला सामोरे जावे लागते.

वरिष्ठ पदाधिकारी, रिझर्व्ह बँक, सरकारमधील अधिकारी व राजकीय नेते यांच्यातील भ्रष्ट युतीमुळे सार्वजनिक बँकांमध्ये राजरोस लूट सुरू असते. या व्यवस्थेविरोधात आवाज उठवणारे माहिती अधिकार चळवळीतील कार्यकर्ते अथवा कामगार संघटनांतील कार्यकर्त्यांचे अभिमन्यूसारखे हाल होतात. साडे बारा लाख कोटी रुपयांची थकीत कर्जे ‘राइट ऑफ’ केली जातात, पण याला कोणीही जबाबदार नाही, यापेक्षा ठोस पुरावा कोणता हवा?

या साऱ्या लुटीला धोरणांचा आधार असतो. न्यायालयासमोर या धोरणांना आव्हान दिले गेले तरी डोळ्यावर पट्टी बांधलेली न्यायव्यवस्था ‘आम्ही धोरणांमध्ये हस्तक्षेप करणार नाही,’ अशी भूमिका घेते. कर्ज मंजुरी, गुंतवणूक, थकीत कर्जे, सॉफ्टवेअर व हार्डवेअर खरेदी अशा अनेक व्यवहारांमध्ये अपारदर्शकता असते. या सगळ्या निर्णयांना समित्यांचा आधार असतो, म्हणजे कोणत्याही निर्णयाला कोणी एकटा जबाबदार नसतो. परिणामी, कोणालाच दोषी धरले जात नाही.

यावर उपाय म्हणून काही जण बँकांचे खासगीकरण हा ‘जालीम उपाय’ सुचवतात. मात्र, येस बँक, ग्लोबल ट्रस्ट बँक आणि २००८ मधील जागतिक वित्तीय अरिष्टाकडे, जेथे हा उद्योग खासगी क्षेत्रात आहे, ते सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. खासगी बँकांमधील अपारदर्शकता आणखी गडद असते. बँका कोसळल्यानंतरच ते प्रकार समोर येतात. त्यामुळे सार्वजनिक बँकांचे खासगीकरण म्हणजे रोगापेक्षा औषध भयंकर, अशी स्थिती निर्माण होईल.


यावर उपाय म्हणजे, बँकांना खरीखुरी स्वायत्तता द्यायला हवी. वरिष्ठ कार्यपालकांवर आचारसंहिता लागू केली पाहिजे व त्यांच्यावर अधिकाधिक उत्तरदायित्व निश्चित केले गेले पाहिजे. बँकेतील वरिष्ठ कार्यपालकांच्या नेमणुका व पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता आणायला हवी. तसेच बँकेशी संबंधित व्यवहारांमध्ये व निर्णयांमध्येसुद्धा पारदर्शकता बंधनकारक असायला हवी. सरकारने एकदा दिशा स्पष्ट केल्यानंतर, सत्ताधाऱ्यांनी तपशिलात हस्तक्षेप करू नये, तरच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे भरकटलेले तारू योग्य दिशेने वाटचाल करू शकेल!

# संयमाचा बांध

**ही कारवाई करण्याची गरज का भासली, यावरही मोदी यांनी प्रकाश टाकला आणि यापुढील काळात दहशतवादी हल्ले हे युद्धच मानले जाईल, त्यामुळे दहशतवाद्यांचे भरणपोषण थांबवा, असा कडक इशाराही दिला. आता पाकिस्तान या घटनाक्रमातून काही धडा घेणार का, हे येत्या काळात स्पष्ट होईल.**

पाकिस्तानाशी संघर्षविरामाला मान्यता दिल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्याच भाषणातून भारताचा करारी बाणा आणि योग्य वेळी संयम राखण्याची भूमिका नेमकेपणाने जगापुढे आली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सुरू केलेले ‘ऑपरेशन सिंदूर’, पाकिस्तानशी लष्करी संघर्ष आणि अमेरिकेच्या पुढाकाराने त्याला स्थगिती या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देश-विदेशातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत होत्या; तसेच विशेषतः अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानांवरून शंकाही उपस्थित करण्यात येत होत्या. मोदी यांच्या भाषणातून यापैकी बहुतांश प्रश्नांना उत्तरे मिळाली आहेत. पाकिस्तानच्या पोकळ धमक्यांना भारताने लक्ष्याधारित हल्ल्यांद्वारे उत्तर दिलेच होते; पण योग्य वेळी सामोपचाराची भूमिकाही घेतली. त्यामुळेच संघर्षाची चाहूल लागल्यापासून ‘अण्वस्त्रधारी देश’ म्हणून पाककडून आळविण्यात येत असलेल्या पालुपदाच्या पार्श्वभूमीवर मोदी यांच्या ‘अण्वस्त्रांना घाबरत नाही,’ या भूमिकेला कृतीचे बळ प्राप्त झाले. अमेरिकेच्या पुढाकाराबाबत काही बाबी देशवासीय आणि जगापुढेही स्पष्ट करणे आवश्यक होते. सोबतच अमेरिकेचा पुढाकार हा सध्याचा संघर्ष निवळण्यापुरताच असल्याचे सांगून पाकिस्तानशी चर्चेच्या शक्यतेबाबतही भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार गरजेचा होता. त्या पार्श्वभूमीवर काश्मीरप्रश्नी फक्त ‘पाकव्याप्त काश्मीर’ याच मुद्द्यावर चर्चा होऊ शकते, हेसुद्धा ठळकपणे जगापुढे आले. दहशतवादाच्या दुखण्यावर भारताने सिंधू करार स्थगितीपासून ते ‘ऑपरेशन सिंदूर’पर्यंत पावले उचलली आहेत. ही कारवाई करण्याची गरज का भासली, यावरही मोदी यांनी प्रकाश टाकला आणि यापुढील काळात दहशतवादी हल्ले हे युद्धच मानले जाईल, त्यामुळे दहशतवाद्यांचे भरणपोषण थांबवा, असा कडक इशाराही दिला. आता पाकिस्तान या घटनाक्रमातून काही धडा घेणार का, हे येत्या काळात स्पष्ट होईल. गेली काही दशके पाकपुरस्कृत दहशतवाद वारंवार डोके वर काढत आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या काही काळात भारताने पाकिस्तानला जागतिक पातळीवर एकटे पाडण्यासाठी कूटनीती अवलंबिली; मात्र खुद्द पाकिस्तानला एक प्रकारे अनुल्लेखाने मारण्याचे एक अलिखित धोरणही दिसून येत होते. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानची आदळआपट सुरू झाली. भारताने एकीकडे घटनेतील कलम ३७० रद्द केल्याने काश्मीर प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या पाकच्या प्रयत्नांना आळा बसला होता. तसेच तेथे प्रचंड मतदानाद्वारे झालेल्या निवडणुकीतून लोकनियुक्त सरकारची स्थापना आणि पर्यटनाद्वारे आर्थिक विकासाला चालना, अशी पावले उचलण्यात येत होती. परिस्थिती सुरळीत होत असल्याचे हे चित्र धूसर करण्याचा प्रयत्न पहलगाम हल्ल्यातून झाला होता. त्याला लष्करी आणि कूटनीतीच्या मार्गाने दिलेल्या कडक उत्तराने भारत या संघर्षात चार पावले पुढे राहिला आणि दहशतवादाला दयामाया नाही, हा संदेश दिलाच; सोबतच युद्ध हा कायमस्वरूपी उपाय नाही, हे लक्षात घेऊन शस्त्रसंधीला प्रतिसाद दिल्याने, भारत पाकिस्तानप्रमाणे युद्धखोर नसल्याचे पुन्हा अधोरेखित झाले. यामुळे भारताची प्रतिमा उजळून निघाली, हे यावर टीका करणाऱ्या शंकासुरांनी समजून घेतले पाहिजे.

# विद्यार्थ्यांनो अपयशाच्या भीतीने आयुष्याचा निकाल नको!




**दहावी, बारावीच्या परीक्षेच्या निकालाच्या भीतीने विद्यार्थी आत्महत्या करताना दिसतात. काही विद्यार्थी घरातून पळून जातात. या निर्णयामागे विद्यार्थ्याची स्वविचाराची वाट नव्हती, तर मनात पालकांची भीती होती, मार्कांचा ताणतणाव होता. हा भीतीचा स्तर अलीकडे दिवसेंदिवस खाली येतो आहे. भविष्यात निम्न प्राथमिक स्तरावर हा तणाव आला तर नवल वाटायला नको. ही वाट अशीच चालली, तर उद्या ही संख्या अधिकाधिक वाढत जाण्याचा धोका आहे. परीक्षा आणि निकालाची भीती म्हणजे शिक्षणाचा प्रवास चुकीच्या दिशेने सुरू झाल्याचा पुरावा मानायला हवा.**

परवा अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने चाकूने गळा कापून आत्महत्या केली. त्यासंदर्भात त्याने व्हॉट्सॲप स्टेटस ठेवला होता. पोलिसांच्या तपासात उत्कर्ष महादेव शिंगणे हा विद्यार्थी शैक्षणिक दबावामुळे नैराश्यात होता. त्यातून आत्महत्या झाली असल्याचे म्हटले आहे, तर नागपूरला दहावीच्या परीक्षेत प्रथम नापास झाल्यानंतर पुन्हा परीक्षा दिली आणि आता पुन्हा नापास होण्याच्या भीतीने आर्यन लुटे या विद्यार्थ्याने आत्महत्या केली.

बारावीत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली. या सर्व घटना होत असतानाच, निकालाच्या भीतीने एका सातवीच्या वर्गातील विद्यार्थिनीने घरातून पलायन केल्याची घटना समोर आली. दहावी, बारावीच्या परीक्षेच्या निकालाच्या भीतीने विद्यार्थी आत्महत्या करत होते. काही विद्यार्थी घरातून पळून जात होते. या निर्णयामागे विद्यार्थ्याची स्वविचाराची वाट नव्हती, तर मनात पालकांची भीती होती, मार्कांचा ताणतणाव होता.

हा भीतीचा स्तर अलीकडे दिवसेंदिवस खाली येतो आहे. भविष्यात निम्न प्राथमिक स्तरावर हा तणाव आला तर नवल वाटायला नको. ही वाट अशीच चालली गेली, तर उद्या ही संख्या अधिकाधिक वाढत जाण्याचा धोका आहे. परीक्षा आणि निकालाची भीती म्हणजे शिक्षणाचा प्रवास चुकीच्या दिशेने सुरू झाल्याचा पुरावा मानायला हवा.

मागील आठवड्यात महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरातील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी परीक्षेच्या निकालाच्या भीतीने घरातून पळून गेली. पळून जाताना तिने आपल्या लहान बहिणीलादेखील सोबत नेले होते. पोलिसाची कर्तव्यदक्षता आणि जागरुकतेमुळे मुलगी सापडली आणि पालकांच्या हाती मिळाली. चौकशीनंतर सातवीच्या निकालाच्या भीतीने घर सोडल्याचे तिने सांगितले. ही घटना घडून चार-पाच दिवस होत नाही तोच खरगपूरच्या आयआयटीमध्ये शिकणाया एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचे वृत्त येऊन धडकले.

उत्कर्ष नामक विद्यार्थ्याने स्वतःचा गळा कापून आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण नोंदवताना अभ्यासाचा ताण आणि नैराश्यामुळे आत्महत्या करत असल्याची चिठ्ठी मागे ठेवली. गेल्या काही वर्षांपासून कोटा येथील आत्महत्यांचे सत्र सातत्याने सुरू आहे. शिक्षणाचा हा परिणाम अत्यंत नकारात्मक आहे. शिक्षणामुळे हे घडत असेल, तर शिक्षणाच्या संदर्भाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. शिक्षणामुळे कोणत्याही बालकाचा मृत्यू हा शिक्षण व्यवस्थेसाठी वेदनादायीच म्हणायला हवा.

एकीकडे पाल्यांचा बळी जातो आहे. त्यांचे आयुष्य अंधाराच्या खाईत लोटले जात आहे. गेली काही वर्षे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सातत्याने वाढत आहेत. जीवन जगण्याची वाट समृद्ध करण्याच्या प्रवासात, वाट समृद्ध होण्याऐवजी अंधारमय बनते आहे. शिक्षणाने जीवन समृद्ध बनायला हवे. जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिक्षणाने हिंमत देण्याची गरज आहे. मात्र तसे न घडता ही कोवळी पानगळ होत असेल, तर पालक आणि व्यवस्थेने याकडे गांभीर्याने पाहायला हवे.

उद्याचे भविष्य ज्या बालकांच्या हाती आहे ती पिढीच निराशाग्रस्त बनण्याची शक्यता आहे. खरेतर मुलांचे शिक्षण आनंदाने होऊ देणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. पालक म्हणून अपेक्षांचे ओझे सतत लादले जात आहे. आपले स्वप्न पूर्ण करण्याचा मार्ग म्हणून पाल्यांकडे पाहिले जात आहे. समाजात पालकांची प्रतिष्ठा पाल्यांच्या मार्कांच्या आलेखात दडलेली आहे.

शिक्षण म्हणजे मार्क नाही हे लक्षात घेऊन मुलांना मुक्तपणे विकसित होऊ देण्याची गरज आहे. आज पालकांनी लादलेल्या विविध अपेक्षांच्या ओझ्याखाली मुले दबून जात आहेत. जीवन फुलण्यासाठीच्या मार्गांच्या प्रवासापेक्षा एकेरी प्रवास करण्यासाठी पालक आग्रह करताना दिसत आहेत. जीवन हेच शिक्षण असायला हवे. शिक्षण सुरू असतानाच जीवनाला सामोरे जाण्यासाठीची तयारी व्हायला हवी आहे.

जगात मातृत्व आणि पितृत्व नैसर्गिकरित्या मिळते, मात्र त्यापलीकडे असलेल्या पालकत्वाचा मार्ग चालण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. १८३५ साली फरार यांनी लिहिलेल्या ह्यकुटुंबप्रवर्तननीतिह्य या पुस्तकात पालकत्वासंदर्भाने अत्यंत मोलाचा संदेश नमूद केला आहे. श्रीमती फरार लिहितात की, मुलांचे केवळ पालनपोषण केले म्हणजे आईबाबांची जबाबदारी संपत नाही. त्यांना सुमार्गाकडे वळवावे लागते. ती जबाबदारी आईबाबांची आहे.

आज पालनपोषण करण्याची आणि शिक्षण देण्याची जबाबदारी पालकांची आहे असे मानले, तरी शिक्षणाचा अर्थ केवळ अक्षर साक्षरता आणि मार्क एवढ्यापुरता मर्यादित नाही. वर्तमानात पालकत्वाच्या शिक्षणाची गरज अधिकाधिक अधोरेखित होऊ लागली आहे. शिक्षणाचा मूलभूत अर्थ हरवत चालला आहे. पालकांना आपल्या पाल्याची अधिक चिंता सतावते आहे.

पाल्याचे जीवनातील यश म्हणजे फुलणे, बहरणे, स्वयंस्फूर्तीने वाट चालणे नाही, तर पैसा, संपत्ती, सत्ता मिळवणे, असे त्यांना वाटत आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या सर्व भावंडांपैकी त्यांच्या आईला सर्वाधिक चिंता रवींद्रनाथाची होती. या मुलाचे भविष्यात काय होईल..? तो जीवनात यशस्वी होईल का? जीवनाला खरंच सामोरे जाऊ शकेल का? असे अनेक प्रश्न त्यांना पडत होते. मात्र आज वर्तमान पाहिले तर रवींद्रनाथांच्या इतके कोणी यशस्वी झाले असे दिसत नाही.

ज्या मुलांची चिंता होती तोच मुलगा आज जीवनात नोबेलसारखा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवत साहित्याच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरला आहे. आईन्स्टाईन हेदेखील अगदी प्राथमिक शाळेतील परीक्षा नापास झाले होते. शिक्षकांनी लिहिलेल्या नोंदीमध्ये हा मुलगा शिक्षणात यशस्वी होऊ शकणार नाही असे मत नोंदवले होते. त्यानंतरचा इतिहास अवघे जग जाणते आहे.

शिक्षणातील मार्क आणि तेथील यश म्हणजे जीवनातील यश नाही. आजही जीवनात जी माणसं यशाच्या शिखरावर चढलेली दिसत आहेत, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा आलेख अधिकाधिक उंचावला आहे. त्यांच्या जीवनाकडे पाहिले तर शिक्षणात ज्याला यश म्हणतात ते कितीजणांच्या नशिबी होते. बहुतेकांना आपल्या शैक्षणिक आयुष्यात फारसे यश प्राप्त करता आलेले नाही. गानकोकिळा लता मंगेशकर इयत्ता तिसरीपर्यंत शिकल्या होत्या.

क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर इयत्ता दहावी नापास, समाजसेवक अण्णा हजारे नववी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील सातवी अशी कितीतरी माणसं प्रत्यक्ष जीवनात यशस्वी झाली आहेत. शैक्षणिक अपयशाने त्यांचे जीवन झाकोळले गेले असले, तरी जीवनातील कर्तृत्वाने त्यांचे अपयश चक्क पुसले गेले आहे. त्यांच्या जीवन यशात शिक्षणाच्या अपयशाची दखलही घेतली जात नाही.

पालकांनी त्यांच्या शैक्षणिक अपयशाचा विचार केला नाही. त्यांच्या अपयशाशी आपली प्रतिष्ठा जोडली नाही. त्यांच्या भविष्याशी केवळ पुस्तकी अभ्यास जोडला नाही. प्रत्येक वेळी त्यांच्या अपयशातही आत्मविश्वासाने आधार देण्याचा प्रयत्न केला. दहावीत नापास झालेल्या सचिनची मार्कशीट पाहिल्यावर निराश असलेल्या सचिनला वडील प्रा. रमेश तेंडुलकर म्हणाले, सचिन उचल ती बॅट आणि जा मैदानावर खेळायला.

तुला जितका चांगला क्रिकेट खेळता येतो तेवढा चांगला क्रिकेट पास होऊन मार्क मिळवर्णाया मुलांना कोठे खेळता येते? मुळात आपल्या मुलाच्या संदर्भाने मार्कांपेक्षा गुण जाणता येणे हे पालकत्व आहे. पाल्यांच्या गुणांची ओळख झाली,तर त्यांचे भविष्य अधिक यशाच्या जवळ पोहचलेले अनुभवता येईल. मात्र आज पाल्यांच्या गुणांपेक्षा मार्कच वरचढ ठरत आहेत.

आईबाबा हे पाल्यांचे पालक नाही तर मालक झाले आहेत. पाल्यांकडून असलेल्या अपेक्षांमुळे विद्यार्थी निराशेच्या खाईत लोटले जात आहेत. इतक्या लहान वयात निराशा, हृदयविकाराचे झटके विद्यार्थ्यांना येऊ लागले आहेत. विद्यार्थ्यांना जीवनाचा अर्थ माहिती नसताना मरण पत्करावे वाटते आहे. जीवन फुलवण्याच्या वाटा चालण्याऐवजी मृत्यूच्या वाटांचा प्रवास घडतो आहे. अलीकडे विभक्त कुटुंब पद्धतीमुळे पालकत्वाच्या संदर्भाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

दोघेही पती-पत्नी नोकरी करत असल्याने पाल्यांसाठी सर्वाधिक महत्त्वाचा असलेला गुणवत्तापूर्ण वेळ पाल्याच्या नशिबी दिसत नाही. पालकही विविध कारणांनी सतत तणावात आहेत, त्याचेही परिणाम पाल्यांच्या जीवनावर होत आहेत. त्यामुळे शिक्षणात मार्क की गुण, विचार की अनुकरण, पैसा की ज्ञान याचा विचार करण्याची वेळ आली आहे. पालक शिक्षित झाले आहेत, मात्र वर्तमानात विद्यार्थ्यांच्यापेक्षा पालकांसाठीच अधिक सुशिक्षित बनवणारी व्यवस्था उभी करण्याची गरज आहे.

# पौष्टिक गोड सँडविच



**साहित्य :** खजूर, अंजीर, मनुका, अक्रोड, बदाम, जॅम, ब्रेड, बटर.

**कृती :** सगळ्यात आधी खजूर, अंजीर, मनुका यांचे बारीक तुकडे करून घ्या. अक्रोड, बदाम किंचित भाजून जाडसर भुगा करून घ्या. नेहमीप्रमाणे ब्रेडला बटर आणि जॅम लावून घ्या. त्यावर हा सुका मेवा पसरा आणि त्याचे सँडविच बनवा. यामध्ये आवडत असेल तर जॅमऐवजी मधही वापरता येईल. सुके किवी, जदाळू, पिच यांचाही वापर करू शकता.

# केसांच्या समस्यांचे समाधान !

**महागडे केमिकलयुक्त हेयर प्रॉडक्ट सोडून तुम्ही नॅचरल उपायांच्या मदतीने केसांच्या सर्व समस्येला दूर करू शकता. बटाटा एक अशी वस्तू आहे ज्याचे सेवन केल्याने तुम्ही केसांच्या सर्व त्रासांपासून मुक्त होऊ शकता.**

**बऱ्याच** वेळा असं होतं की जास्त केमिकल आणि शॅम्पूचा वापर केल्याने केसांचे बरेच आजार होण्याची शक्यता असते. जास्त करून महिलांचे कोरडे केस, कोंडा आणि केसांची ग्रोथ थांबल्यासारखी वाटते. महागडे केमिकलयुक्त हेयर प्रॉडक्ट सोडून तुम्ही नॅचरल उपायांच्या मदतीने केसांच्या सर्व समस्येला दूर करू शकता. बटाटा एक अशी वस्तू आहे ज्याचे सेवन केल्याने तुम्ही केसांच्या सर्व त्रासांपासून मुक्त होऊ शकता. तुम्ही बटाट्यात मध, दही आणि लिंबाचा रस मिसळून तुमच्या केसांशी संबंधित सर्व समस्यांपासून मुक्ती मिळवू शकता.





**दाट आणि सॉफ्ट केसांसाठी**

दोन ते तीन बटाटे घ्या, याला सोलून याचे पेस्ट तयार करा. यानंतर या पेस्टमध्ये अंड्याचा पिवळा भाग आणि मध मिसळा. त्यानंतर या पेस्टला केसांवर लावा. याला काही वेळ वाळू द्या. जेव्हा हा पॅक वाळून जाईल तेव्हा चांगल्या माइल्ड शॅम्पूने केस धुवून घ्या. दोन ते तीन वेळा याचा वापर केल्याने तुम्हाला केसांमध्ये फरक दिसू लागेल.

**लांब केसांसाठी**

दोन बटाटे घ्या आणि याचा रस काढा. यात दोन चमचे एलोवेरा जेल मिसळा. या मिश्रणाला केसांच्या मुळांना लावा. याला ३० ते ४० मिनिटांपर्यंत केसांमध्ये राहू द्या. यानंतर पाण्याने केस धुवून घ्या. लगेचच शॅम्पू लावायची गरज नसते.

**कोंडा असलेल्या केसांसाठी**

एक किंवा दोन बटाटे घेऊन त्यांचा रस काढून घ्या. या रसात लिंबू आणि दही मिसळून त्या पेस्टला केसांना लावून थोड्या वेळेसाठी राहू द्या. नंतर एखाद्या चांगल्या शॅम्पूने केस धुवून घ्या.

# दुधात हे मिश्रण घालून पायल्याने शांत झोप लागेल

**निरोगी** स्वास्थ्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम आवश्यक आहे. पण त्याचबरोबर पुरेशी झोप घेणेदेखील गरजेचे आहे. आजकाल शांत झोप मिळणे दुर्मिळ झाले आहे. लांबलेल्या कामाच्या वेळा, ताण-तणाव यामुळे नीट झोप लागत नाही. आपल्यापैकी अनेकांनी याचा अनुभव घेतला असेल. झोप न लागण्याची अनेक कारणे असतील, पण त्यामुळे आरोग्यावर परिणाम होऊन त्याच्या समस्या उद्‌भवू लागतात. अपुऱ्या झोपेमुळे कामावर देखील परिणाम होतो. अधिक चांगले काम करण्यासाठी शांत झोपेची गरज असते. कारण त्यामुळेच मन शांत, प्रसन्न राहतं व शरीराला ऊर्जा प्राप्त होते. म्हणून शांत झोप येण्यासाठी हा घरगुती उपाय खूपच फायदेशीर ठरतो. हा उपाय अतिशय सोपा आहे. खसखस गोल्डन ब्राऊन होईपर्यंत तव्यावर थोडी भाजून घ्या. त्यानंतर खसखस ग्राइंड करून घ्या. मग कोमट दुधात जायफळ आणि खसखस पावडर घाला. नीट मिक्स करून दूध प्या. त्यामुळे तुम्हाला नक्कीच शांत झोप लागण्यास मदत होईल.



# फणस खाण्याचे आरोग्याला फायदे तोटे



**सध्या बाजारात फणस सर्वत्र मिळतो. फणस खाल्ल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. फणस आरोग्यासाठी फार लाभदायक आहे. फणसात विटॉमिन ए, सी, थाइमिन, पोटॅशियम, कॅल्शियम, आयरन, फॉलिक ॲसिड, मॅग्नेशियम असते. जे आपल्या शरीरासाठी आवश्यक असते. फणस हे जगातील सर्वात मोठे फळ आहे. डॉक्टर देखील हे खाण्याचा सल्ला देतात. फणसामध्ये काही असे गुण आहेत ज्यामुळे अनेक समस्या दूर होतात. फणस वजन कमी करण्यास मदत करतो. त्याप्रमाणे रक्तदाबही मर्यादित राहतो. फणस खाल्ल्याने डोळ्यांचे विकारही मोठ्या प्रमाणात कमी होतात. फणसाला इंग्रजीमध्ये Jackfruit असे म्हणतात.**

- फणसाची पाने स्वच्छ साफ करून सुकवल्यानंतर पानांचे चूर्ण तयार करा. त्यामुळे पोटाचे विकार कमी होतात.
- तोंड आल्यास फणसाची कच्ची पाने चावून थुंकल्याने तोंडाचे विकार कमी होतात.
- मधुमेह असलेल्या व्यक्तींनी नियमित फणसाच्या पानांच्या रसाचे सेवन करणे फायद्याचे असते. त्याचप्रमाणे उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींसाठी सुद्धा हा रस गुणकारी आहे.
- फणसाच्या सालीपासून निघणारे दूध शरीराच्या सुजलेल्या किंवा दुखापत झालेल्या भागात लावल्यास आराम मिळतो. गुडघ्यांचे आजारही मोठ्या प्रमाणात कमी होतात.
- फणसाच्या कोवळ्या पानांना बारीक करून त्यापासून लहान-लहान गोळ्या तयार करा. त्यामुळे गळ्याचे आजार कमी होतात.
- पिकलेला फणस खाल्ल्याने पोट साफ होण्यास मदत होते. त्यामुळे अपचनाच्या समस्या दूर होतात.
- दमा असलेल्या रुग्णांसाठी फणसाची मुळे फार गुणकारी असतात. फणसाच्या मुळांना उकळून, त्या पाण्याच्या सेवनाने दमा नियंत्रित राहण्यास मदत होतो.
- जर तुम्ही थायरॉइडच्या समस्येचा सामना करत असाल, तर तुम्ही फणसाचे सेवन करावे. फणसात कॉपर तत्त्व असतात, ज्यामुळे थायरॉइड ग्रंथीचा स्राव संतुलित राहतो.
- फणसात असलेल्या मॅग्नेशियममुळे हाडं मजबूत होतात.
- फणसाच्या बियांच्या पावडरमध्ये मध मिसळून लावल्यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

फणस आरोग्यासाठी असला, तरीही त्याचे तोटे देखील आहेत पिकलेल्या फणसामुळे कफ होतो, त्यामुळे सर्दी-खोकला, अजीर्ण इत्यादी आजार तसेच गर्भवती स्त्रियांनी फणसचे सेवन करू नये. तसेच फणस सेवन केल्यावर, पान खाण्यामुळे पोट फुगते. त्यामुळे फणस खाल्ल्यानंतर पान खाऊ नये.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त

**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे. एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्‌वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.



# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.



**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**

हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.



# पाण्यात पाय बुडवून ठेवण्याचे फायदे

**मॉलमध्ये** किंवा मार्केटमध्ये फिरायला तर सर्वांना आवडतं, पण तिथून आल्यावर जो थकवा येतो त्याने अगदी काही काम नको नकोसं वाटतं. पण असा थकवा आपण काही वेळातच दूर करू शकता. त्यासाठी हे करा

- एका टबमध्ये कोमट पाण्यात थोडंसं मीठ घालून आपले दोन्ही पाय बुडवा. याने थकवा दूर होतो आणि चालताना सूज आली असल्यास त्यावरही राहत मिळते.
- ज्या लोकांना रात्री झोप न येण्याची तक्रार असते त्यांनी हा प्रयोग नक्की अमलात आणावा. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडून ठेवावे.
- याने रक्तप्रवाह सुरळीत होतो.
- जे लोक रात्रभर एकाच कुशीवर झोपतात, त्याने सकाळी उठून हा प्रयोग करावा. याने दिवसभर फ्रेश जाणवेल.
- या प्रयोगाने किडनीची एनर्जी वाढते.
- संधिवाताची तक्रार असलेल्या लोकांनी पाण्यात दालचिनी आणि काळे मिरे टाकून पाय पाण्यात ठेवावे.
- हा प्रयोग जेवण झाल्यावर करणे योग्य ठरेल.
- लो ब्लड प्रेशरची तक्रार असलेल्यांनी गरम पाण्यात पाय ठेवून बसू नये. मधुमेही रुग्णांनी पण हा प्रयोग करू नये.

# टॅटू काढून टाकण्यापूर्वी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्या!

**उत्साहाच्या भरात अनेकदा अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी टॅटू काढले जातात. काहीजण आपल्या साथीदाराचे नाव टॅटूमध्ये बनवतात. पण कालांतराने नात्यात दुरावा आल्यानंतर तेच नाव नकोसे वाटते. अशावेळेस टॅटू काढून टाकण्यासाठी नेमके काय करावे? ही प्रक्रिया त्रासदायक असते का? याबाबतचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. के. खतुजा यांनी दिला आहे.**



**टॅटू क्रीम परिणामकारक नसतात**

टॅटू निघून जाण्यासाठी क्रीम्स किंवा बाम यांचा वापर करण फायदेशीर नाही. कोणत्याच घरगुती उपायांनी किंवा क्रीम लावल्याने टॅटूपासून सुटका मिळत नाही.

**लाल किंवा पिवळ्या रंगाचे टॅटू कायमचे जाणे कठीण आहे**

प्रत्येक रंग शोषून घेण्यासाठी काही विशिष्ट वेव्हलेंथ काम करतात. त्यामुळे एकाच वेव्हलेंथमुळे सारेच रंग जाणे कठीण असते. अनेकजण काळे आणि निळे घालवणारे लेझर वापरतात. त्याचाच वापर करून लाल किंवा पिवळा रंग जाणे मुश्कील आहे.

**लेझर त्रासदायक ठरत नाहीत**

लेझर ट्रीटमेंटपूर्वी त्वचेवर काही सोल्युशन लावून तेथील भागातील संवेदनशीलता कमी केली जाते. त्यामुळे काही सेकंद तुम्हाला त्रास जाणवतो. लेझर किरणांमुळे वातावरणातील उष्णता अधिक वाढते. म्हणूनच उपचारांदरम्यान आयवेअर दिली जातात. म्हणजे तुम्हाला काहीच दिसत नाही.

**हात, पाय, घोट्यावरील टॅटू काढणे कठीण आहे**

लोअर बॅकच्या भागापेक्षा बोटाच्या सांध्याजवळील टॅटू काढणे कठीण असते. शरीरात रक्तवाहिन्यांजवळील भागातील टॅटू काढणे अधिक सुकर आहे. पाय, घोटा किंवा हात या भागावरील टॅटू काढणे कठीण आहे.

**अनेक लेझर सेशन्स लागतात**

टॅटू पूर्णपणे काढून टाकण्यासाठी सुमारे १०-१५ सेशन्स लागतात. त्वचेला पुन्हा पूर्ववत होण्यासाठीदेखील वेळ द्यावा लागतो.

**टॅटूच्या खुणा राहतात**

टॅटू पूर्णपणे काढला तरीही त्याच्या थोड्याफार खुणा राहतात. टॅटू काढला तरीही तो कोणत्या भागावर होता हे तुमचे मित्र नक्कीच ओळखू शकतात.

**लेझर ट्रीटमेंटदरम्यान बर्निंग स्मेल येतो**

टॅटू काढताना तुम्हाला काही जाणवत नसले तरीही वास येतो. यादरम्यान त्वचेवर लेझरची किरणे जेव्हा त्वचेत जातात तेव्हा laser plume घटक वातावरणात मिसळल्यानंतर बर्निंग स्मेल येतो.

**काही काळ दुर्गंधीचा त्रास होईल**

स्कार/डाग पडू नये, त्वचा पूर्ववत व्हावी याकरिता काही जेलचा वापर करा. पण ॲन्स्थेशियाचा प्रभाव जसा कमी होतो तसा काही दिवस त्रास जाणवतो.

# चेहऱ्यावर पुन्हा त्याच जागी पिंपल का येतो ?

**पिंपलचा** त्रास टाळण्यासाठी घरगुती उपाय, उत्तम फेसवॉश वापरणे यासारखे सारे खटाटोप करता. परंतु, अनेकांमध्ये विशिष्ट काळानंतर पुन्हा त्याच जागी पिंपल येण्याची समस्या आढळून येते. पिंपल्सचे चेहऱ्यावर त्याच त्याच जागी पुन्हा येणे यामागील नेमके काय याबद्दलचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. सेजल शहा यांनी दिला आहे. त्वचेच्या खाली वाढणारे पिंपल्स अनेकदा त्वचेवर दिसत नाहीत. त्वचेवरील छिद्रांमधून जेव्हा तेल बाहेर पडण्याची प्रक्रिया वाढते तेव्हा सूजही वाढते. त्वचेच्या खाली तेलामुळे गोलाकार फुगवटा निर्माण होतो. त्याचे प्रमाण तेलावर अवलंबून असते. तसेच तुम्हाला सतत चेहऱ्याला हात लावण्याची सवय असेल तर पुन्हा त्याच जागी ॲक्ने वाढण्याचा धोका अधिक असतो. सतत चेहऱ्याला हात लावण्याच्या सवयीमुळे चेहऱ्यावरील मळ, तेल पुन्हा छिद्रांमध्ये ढकलला जातो. यामुळे पिंपल्सची वाढ अधिक प्रमाणात होते.



**पिंपलचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल ?**

पिंपलमध्ये पस निर्माण झालेला असल्यास त्याला फोडण्याचा मोह टाळा. त्याला सतत हात लावू नका. ते आपोआपच कमी होण्यासाठी थोडा वेळ द्या. किंवा डर्मेटोलॉजिस्टचा सल्ला घ्या. अनेकदा पिंपल फोडल्यानंतरही त्यातील सारा पांढरा भाग/पस बाहेर पडत नाही. त्यामुळे पुन्हा त्याजागी पिंपल वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच चेहरा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी salicylic acid युक्त फेसवॉशचा वापर करा. यामुळे अतिरिक्त तेल काढण्यास मदत होते. benzoyl peroxide चा समावेश असलेल्या उत्पादनांची निवड केल्यास त्वचेवर वाढणारे आणि ॲक्नेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टेरियांचा प्रभाव कमी करण्यास मदत होते.

# चमकदार दातांसाठी

## झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

- नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.
- दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.
- ॲपल सिडर व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.



# किरकोळ आजारांकडे दुर्लक्ष नको

**आपल्या दैनंदिन जीवनमानात अगदी किरकोळ आजार हे कधीकधी दुर्लक्षिले जातात, मात्र त्याचा त्रास जाणवू लागला की त्यानंतर डॉक्टरकडे धाव घेतली जाते. मात्र अगदी किरकोळ वाटणारे दुखणे हे एखाद्या आजाराचे कारण आहे असे समजले की मग मनात भीती निर्माण होते. शिवाय त्या आजाराचे गंभीर परिणाम आयुष्याची चिंता, खर्च आदी गोष्टींचे टेन्शन निर्माण होऊन मग वेळीच इलाज केला असता, तर बरे झाले असते असे वाटून जाते. यावेळी अगदी किरकोळ म्हणून वाटणारे दुखणे हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण आहे, असे वाटले तर त्यावर वेळीच इलाजही केला जाऊ शकतो.**

**पित्त :** आपल्याला नियमित काही खाल्ले तर त्याचा त्रास होतो. खाल्लेले पचत नाही, किंवा भूकच लागत नाही. छातीत जळजळ, तेलकट किंवा दुपारच्या जेवणाव्यतिरिक्तही काही खाल्ले तरी ते पचत नाही, म्हणून मग ते किरकोळ पित्तावर ढकलले जाते. पण मग त्याचा अति त्रास झाला की, मग डॉक्टरकडे जाण्यावाचून पर्याय उरत नाही. पित्तामुळे काही खाणे होत नाही. यामुळे एकप्रकारची त्रस्तता दिसून येते. मात्र यावर वेळीच इलाज न केल्यास याचा परिणाम पित्ताचे खडे होणे आदीसारख्या समस्या निर्माण होण्याकडे दिसून येतो. मग पित्ताचे खडे काढण्यासाठी ऑपरेशन केली जातात.



**पोटदुखी :** पोटदुखीसारख्या वारंवार उद्‌भवणाऱ्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. काही घरगुती उपाय करून किंवा अशा दुखण्यांकडे दुर्लक्ष करून ती किरकोळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे, किंवा इतरवेळी वारंवार पोटात दुखणे हे नेहमीचेच म्हणूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एका उदाहरणामध्ये एका महिलेच्या वारंवार पोटात दुखण्याच्या तक्रारीमुळे काही घरगुती इलाज केल्यानंतरही काही गुण नाही म्हणून मग डॉक्टरी उपाय करण्याचे ठरले. स्टोनमुळे पोटात दुखत असावे असा अंदाज करून डॉक्टरनेही त्यावरील औषधे सुरू केली. काही पथ्ये सांगून औषधांना खर्चदेखील झाला. मात्र, तरीदेखील हे दुखणे सुरूच राहिल्याने शेवटी तज्ञांकडून तपासणी केली असता, गंभीर आजाराचे निदान झाले आणि हेच वारंवार दुर्लक्षिले गेलेले दुखणे आयुष्याची चिंता भेडसावणारे ठरले.

**डोकेदुखी :** अगदी कोवळ्या वयाची मुले आपले डोके दुखते म्हणून अगदी डोके धरून बसतात. यावेळी लहान मुलांना चष्मा लागणे स्वाभाविक आहे म्हणून त्यांना चष्मा असावा असा अंदाज करून डोकेदुखीच्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. शालेय जीवनात अशा तक्रारी वारंवार उद्‌भवताना दिसून येतात. चक्कर येणे, डोके दुखणे अशा आजाराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा लहान मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

# एकाचवेळी ५ हजार विद्यार्थी विद्यार्थिनी बनल्या सायकलस्वार, शेकापच्या चित्रलेखा पाटील यांचा पेडल ऑफ होम उपक्रम

**■अलिबाग :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेसाठी करावा लागणारा प्रवास त्रासदायक असतो. कमी अंतरासाठीही विद्यार्थ्यांचा बराच वेळ बसची वाट पाहण्यात किंवा चालत जाण्यात जातो. त्यांची वेळेची गरज लक्षात घेऊन शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा महिला आघाडीप्रमुख आणि सीएफटीआयच्या संचालिका चित्रलेखा पाटील यांनी गुरुवारी (१५ मे) एक-दोन-तीन-चार-पाच नाही तब्बल ५ हजार सायकली या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना भेट म्हणून दिल्या. त्यावेळी या मुला-मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद खूप काही सांगत होता.





चित्रलेखा पाटील यांनी यापूर्वीही हजारोंच्या संख्येने विद्यार्थिनींना सावित्रीच्या लेखी या उपक्रमातून सायकलींचे वाटप केले आहे. तरीही एकाचवेळी ५ हजार सायकली वाटप करण्याचा हा सर्वात मोठा कार्यक्रम होता. अलिबाग तालुक्यातील १७ गावांमधील ५ हजार शाळकरी मुला-मुलींना सायकली देताना त्यांना सोबत शाळेची बॅग, युनिफॉर्म, बूट, वह्या, छत्री आणि स्वेटर देखील देण्यात आले. यातून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती मिळणार असून त्यांचा शिक्षणाचा मार्ग सुखाचा आणि समृद्ध करण्याचा प्रयत्न करत आहोत, असे प्रतिपादन यावेळी चित्रलेखा पाटील यांनी केले. तसेच एक लाख सायकली वाटपाचा संकल्प त्यांनी बोलून दाखवला.



उद्योगपती जयदेव मोदी यांच्या माध्यमातून चित्रलेखा पाटील यांनी ह्यपेडल ऑफ होमह्व हा कार्यक्रम पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात केला. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, त्यांचे पालक उपस्थित होते आणि सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. या कार्यक्रमासाठी शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, सुरेश घरत, नरेश म्हात्रे, विलास म्हात्रे, धोकवडेचे माजी सरपंच सचिन म्हात्रे, वेश्वीच्या रश्मी पाटील, विजय भगत, रविंद्र पाटील, प्रमोद घासे, अनिल पाटील, विक्रांत वार्डे, अमोल नाईक, महाविद्यालय, विद्यालयातील प्राचार्य आणि मुख्याध्यापक आवर्जून उपस्थित होते.

> "गावे, वाड्यांमधील मुले शिकली पाहिजेत हा दिवंगत नारायण पाटील आणि प्रभाकर पाटील ध्यास होता. तो वारसा जपण्याचे काम पाटील कुटुंबाकडून आजही केले जात आहे. पाटील कुटुंबीयांनी शैक्षणिक, सामाजिक, सहकार अशा अनेक संस्था उभारल्या, वाढवल्या आणि समाजोपयोगी केल्या. त्याच धर्तीवर सीएफटीआय संस्था उदयास आली. या संस्थेच्या माध्यमातून सुमारे दीड लाख लोकांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल झाला आहे. कोरोनाकाळात वॅक्सिन वाटप, शाळकरी मुलींना सायकल देणे, अन्नधान्य तसेच घरकूल देऊन उभारी देण्याचे काम केले आहे. अलिबागसह मिझोराममध्येही गरजूंना मदतीचा हात दिला आहे."
>
> **-चित्रलेखा पाटील, संचालिका, सीएफटीआय**

# शिवसेनेच्या मोर्चापूर्वी एमआयडीसीचा मोठा निर्णय, ३५६ कोटींच्या निविदा रद्द

**■अलिबाग :** शहापूर-धेरंड परिसरात होणाऱ्या सिनार मस कारखान्यासाठी अद्याप भूसंपादन झालेले नाही. तत्पूर्वी या कंपनीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी जलवाहिनीसाठी ३५६ कोटीच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. या विरोधात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटना खारेपाट विभागातील शेतकऱ्यांनी पुकारलेल्या आंदोलनाला यश आले आहे. आता शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्याचबरोबर कुसुंबळे ग्रामपंचायत हद्दीतील २८ गावांना फिल्टर पाण्याची वाहिनी टाकण्याच्या कामाला एमआयडीसीने तत्काळ प्रशासकीय मान्यता देत १५ मे रोजी एमआयडीसी कार्यालयावर काढण्यात आलेला मोर्चा रद्द करावा, अशी विनंती केली. त्यानुसार शिवसेनेने मोर्चा स्थगित केल्याची घोषणा राजा केणी यांनी केली आहे.

कुसुंबळे विभागातून जिल्ह्यातील मोठ्या औद्योगिक प्रकल्पांना जलवाहिनी जात असताना स्थानिक पाण्यापासून वंचित होते. राजा केणी यांनी येथील हजारो नागरिकांना




**२८ किलोमीटरची जलवाहिनी**

सिनार मस कंपनीसाठी नागोठणे ते बांधण अशी २८ किलोमीटरची जलवाहिनी टाकली जाणार आहे. यासाठी १६७ कोटी आणि हे पाणी उचलण्यासाठी बांधण येथे १८९ कोटींची जॅकवेल बांधली जाणार आहे. यासाठी एमआयडीसीने निविदा प्रक्रिया पूर्ण केली होती. ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येत असल्याचे कार्यकारी अभियंता संजय ननवरे यांनी सांगितले.

न्याय मिळवून देताना एमआयडीसीकडून फिल्टर प्लांटच्या कामाला तत्काळ प्रशासकीय मान्यता मिळवून दिली आहे. विशेष म्हणजे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून सिनार मस कंपनीसाठी जलवाहिनी जात आहे, त्या शेतकऱ्यांना अजिबात विश्वासात घेण्यात आलेले नव्हते. शेतकऱ्यांना देशोधडीला लावून उद्योगांना पायघड्या घालणाऱ्या या प्रकरणात राज्याच्या उद्योग मंत्रालयाच्या भूमिकेलाच या शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. यासाठी शेतकरी संघटना खारेपाट विभागाचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्या नेतृत्वाखाली १५ मे रोजी अलिबागमधील एमआयडीसी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला होता.

मोर्चापूर्वी एमआयडीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना चर्चेसाठी बोलावले होते. यावेळी एमआयडीसी अलिबाग विभागाचे कार्यकारी अभियंता संजय ननवरे यांच्याशी झालेल्या चर्चेत या मागण्या मान्य करण्यात आल्या. चर्चा करण्यासाठी राजा केणी, अलिबाग तालुका संघटक जीवन पाटील, शेतकरी संघटना खारेपाट विभागाचे सदस्य स्वप्नील म्हात्रे, मन्मय पाटील, मेघनाथ पाटील, प्रमोद पाटील, गणेश पाटील, संतोष पाटील, प्रदीप केणी, आदर्श पाटील, नाना खराडे, रघुनाथ पाटील आदी उपस्थित होते.

# आरोपींना फाशी आणि आम्हाला न्याय द्या, आक्रोश मोर्चात रोहेकरांची मागणी

**■पनवेल :** न्यायालयाच्या निकालाविरोधात प्रचंड नाराजी व्यक्त करत रोहेकरांनी आक्रोश मोर्चा काढून पुन्हा न्यायाची मागणी केली आहे. शेकडो रोहेकर मंगळवारी (१३ मे) रस्त्यावर उतरले होते आणि त्यांनी तहसीलदार कार्यालयापर्यंत आक्रोश मोर्चा काढून न्यायाशी अपेक्षा व्यक्त केली. त्यामुळे आमचा आवाज सरकारने ऐकला का, आम्हाला न्याय मिळणार का, खऱ्या आरोपीला शिक्षा होणार का, असे सवाल रोहेकरांकडून उपस्थित होत आहेत.

**निकाल धक्कादायक**

८ मे रोजी या खटल्याचा माणगाव न्यायालयाने निकाल दिला. सर्व आरोपींची निर्दोष सुटका हा निकाल रोहेकरांसाठी धक्कादायक असल्याने त्यांनी लगेचच पत्रकार परिषद



रोहा तालुक्यातील तांबडी गावातील एका शाळकरी मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. जून २०२० मधील ही घटना आहे. या घटनेने रायगड जिल्हा हादरला होता. हे प्रकरण माणगावच्या फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात आले. सरकारतर्फे उज्ज्वल निकम यांनी फियादींची बाजू मांडली. तरीही माणगाव न्यायालयाने या खटल्यातील सात आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष सुटका केली.

घेत नाराजी व्यक्त केली तसेच आंदोलनाचा इशारा दिला होता. त्याप्रमाणे शेकडो रोहेकरांनी मंगळवारी राम मारुती चौकापासून तहसीलदार कार्यालयापर्यंत जनआक्रोश मोर्चा काढला आणि उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांना निवेदन देत न्यायाची मागणी केली. या आक्रोश मोर्चात महिलांची संख्या उल्लेखनीय होती. यावेळी ह्यआरोपींना फाशी आणि आम्हाला न्याय द्याह्व अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

**पुन्हा चौकशीची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाचा तपास योग्य पद्धतीने केला आहे का, हे तपासण्यासाठी विशेष समिती स्थापन करावी. सक्षम यंत्रणेची नव्याने नियुक्ती करून या प्रकरणाची चौकशी करावी आणि पिडीतेला न्याय मिळवून द्यावा. तसेच मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल करावा आणि त्यासाठी सक्षम सरकारी वकिलांची नियुक्ती करावी, शिवाय पुरावे गोळा करण्यासाठी एसआयटी आणि अन्य विशेष सक्षम यंत्रणा स्थापन करावी, अशा मागण्या रोहेकरांनी उपविभागीय अधिकाऱ्याना दिलेल्या निवेदनात केल्या आहेत.

# आयुक्तालयाच्या ताफ्यात लवकरच १७ नवीन टोईंग वाहने

**■भाईंदर :** 'नो पार्किंग' क्षेत्रात उभ्या राहणाऱ्या वाहनांवर कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात लवकरच १७ नवीन टोईंग वाहने दाखल होणार आहेत. यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात सुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मिरा-भाईंदर आणि वसई-विरार शहरांमध्ये वाहनांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. परिणामी, रस्त्यांवर ताण निर्माण होत असून अरुंद रस्त्यांवर वाहने उभी करण्याच्या प्रवृत्तीमुळे



वाहतूक कोंडी निर्माण होते. या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस आयुक्तालयामार्फत 'नो पार्किंग' क्षेत्र निश्चित करण्यात आली आहेत. या ठिकाणी वाहने उभी केल्यास ती टोईंग करून पोलिसांच्या गोदामात नेली जातात आणि संबंधित वाहनचालकावर दंडात्मक कारवाई केली जाते.

मात्र, मागील काही महिन्यांपासून या कारवाईचा वेग मंदावल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे या प्रक्रियेला गती देण्यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या सूचनेनुसार टोईंग वाहनांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने १७ अतिरिक्त टोईंग वाहनांचा प्रस्ताव वाहतूक विभागाने तयार केला होता, त्याला आता अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. ही वाहने लवकरच प्रत्यक्ष रस्त्यांवर कारवाई करताना दिसणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली आहे.

# एमएससीआयटीचे विद्यार्थी एसटी पाससाठी अपात्र आहेत का, अधिकाऱ्यांची नकारघंटा कशासाठी

**■पेण :** राज्य परिवहन महामंडळाकडून विद्यार्थ्यांना मासिक किंवा त्रैमासिक पास सवलतीच्या दरात दिले जातात. मात्र, पेण एसटी डेपो आणि रामवाडी एसटी डेपोकडून आयटीआय, टायपिंगचे विद्यार्थी आणि एमएससीआयटीचे विद्यार्थी यांच्यात भेद केला जात आहे. त्यामुळे एमएससीआयटीच्या विद्यार्थ्यांना पास देण्यास नकार दिला जात आहे. पेण, रामवाडी एसटी डेपोतील अधिकाऱ्यांकडून एमएससीआयटीच्या विद्यार्थ्यांना सावत्र वागणूक दिली असून याची झळ गरीब विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना बसत आहे.

एसटी पास काढल्यास विद्यार्थ्यांना




रायगड जिल्ह्यातील ९ हजार ६६९ विद्यार्थ्यांनी २०२४ मध्ये एमएससीआयटीचे शिक्षण घेतले आहे. २०२३ मध्ये १५ हजार ९५९ आणि २०२२ मध्ये १७ हजार ७७३ एमएससीआयटीचा कोर्स करून कम्प्युटरचे ज्ञान मिळवले. सरकारी नोकरीसाठी एमएससीआयटीच्या कोर्सला मान्यता आहे. त्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी दरवर्षी एमएससीआयटीचा कोर्स करतात.

६७ टक्के सवलत मिळते. पेणमध्ये एमएससीआयटीचे प्रशिक्षण देणाऱ्या सहा संस्था असून शेकडो विद्यार्थी येथे शिकत आहेत. महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन अंतर्गत एमएससीआयटीचे प्रशिक्षण राज्यभर सुरू आहे. त्यामुळे आजूबाजूच्या गावांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी पासची गरज असते. मात्र, पेण तसेच रामवाडी एसटी डेपोकडून एमएससीआयटीच्या विद्यार्थ्यांना पास दिला जात नाही. शासकीय परिपत्रकानुसार तंत्र व व्यावसायिक शिक्षण अंतर्गत सुरू झालेले विविध अभ्यासक्रमात शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांना एसटीचा विद्यार्थी पास देण्यास मान्यता देण्यात आली आहे. याचा पेण एसटी डेपोतील अधिकाऱ्यांना विसर पडला आहे.

या अधिकाऱ्यांच्या मते आयटीआय आणि टायपिंग क्लासचे विद्यार्थीच तंत्र व व्यावसायिक शिक्षण अंतर्गत मोडतात. मात्र, याचा आर्थिक भुर्दंड विद्यार्थ्यांच्या गरीब पालकांना बसत आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीने पनवेल एसटी डेपोत विचारणा केली असता पनवेल डेपोतून एमएससीआयटीच्या विद्यार्थ्यांना मासिक पास दिले जातात, अशी माहिती देण्यात आली. तर मग पेण आणि रामवाडी एसटी डेपोतील अधिकारी आडमुठेपणा का करतात, असा पालक आणि विद्यार्थ्यांचा सवाल आहे. विशेष त्यांना सवलतीचा पास नाकारून एसटीची तीन महिन्यांचा पास काढण्याचा सल्ला अधिकारी देत आहे.

# ऐरोलीतील गणेश मंदिरावरील कारवाईची 'इच्छापूर्ती' वनमंत्र्यांना भोवणार?

**■नवी मुंबई :** राज्याचे वनमंत्री तथा ऐरोलीचे आमदार गणेश नाईक यांनी कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिल्यानंतर पालिकेने तोडक मोहिम सुरु केली आहे. त्यानंतर राजकीय द्वेषाने ऐरोली सेक्टर-१५ येथील इच्छापूर्ती श्री गणेश मंदिरावर देखील कारवाई करणार असल्याचे बोलले जात आहे. कारवाईच्या दबाव तंत्रामुळे शिवसेना आणि भाजपमध्ये निवडणुकीपुर्वी जुंपली आहे. मंदिरावर कारवाईचा कट वनमंत्र्यांनीच रचला असल्याचा आरोप शिवसेनेचे उपनेते विजय चौगुले यांनी पत्रकार परिषदेत करीत आक्रमक भुमिका घेतली आहे. तर श्री गणेश मंदिर बचाव समितीने स्वाक्षरी मोहिम राबवली आहे. मंदिरावर कारवाई झाली तर वनमंत्री गणेश नाईक यांना मोठा फटका बसणार असून महायुतीत ऐन पालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत दुफळी निर्माण होणार आहे.

या विषयी बोलताना उपनेते चौगुले म्हणाले की, १९९५ मध्ये येथील रिक्षाचालकांनी एकत्र येऊन ऐरोली सेक्टर-१५ परिसरात मंदिर उभारले होते. कलांतराने या मंदिरांचे पावित्र्या वाढू लागले. लोकवर्गणीतून लोकवर्गणीतून मंदिराचे नव्याने रेखीव बांधकाम करण्यात आले आहे. लोकांची या मंदिरांबद्दल निष्ठा आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र




मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिंदूत्वाचा नारा देत आहेत. परंतु मंदिर तोडण्याची भूमिका घेणारे वनमंत्री हिंदू आहेत की मुस्लिम आहेत. हे कळत नाही. त्यांच्याकडून छुपा वार केल्याचा आरोप चौगुले यांनी केला आहे. मंत्रालयापासून ते पालिका आयुक्तापर्यंत मंदिर तोडण्यासाठी वनमंत्र्यांकडून दबाव टाकला जात आहे. मंदिरावरील कारवाईचा घाट हा राजकीय आकस आणि कुटील भुमिकेमुळे केल्याचा आरोपही चौगुले यांनी केला आहे. जर इच्छापूर्ती गणेश मंदिरावर कारवाई करण्याच्या प्रयत्न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल. अयोध्येतील राम मंदिराच्या वेळी जशी घटना घडली होती. त्याच पध्दतीने ऐरोलीमध्ये देखील रक्ताचे पाट वाहतील. तर कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्यास याला प्रशासन जवाबदार असेल, असा इशारा चौगुले यांनी दिला आहे.

संकष्टी चतुर्थीच्या दिवशी १६ मे रोजी कारवाई करावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. मंदिर बचावासाठी येथील रहिवाशांची स्वाक्षरी मोहिम घेण्यात येत असून या स्वाक्षरीच्या प्रती पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवणार आहे.

या पत्रकार परिषदेस शिवसेनेचे जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, ठाणे लोकसभा युवकचे अध्यक्ष ममित चौगुले, नवी मुंबई युवासेनेचे अनिकेत म्हात्रे, माजी नगरसेवक आकाश मढवी, राजू कांबळे, माजी नगरसेविका नंदा काटे उपस्थित होते.

# रायगडच्या बीडमध्ये हळद माखली रक्ताने



**■अलिबाग :** लग्नात डीजेच्या तालावर कपडे काढून बेधुंद नाचणाऱ्यांना अडवले म्हणून एवढे भांडण झाले की एकाने जीव गमावला तर दुसरा जबर जखमी झाला. ही घटना आहे खालापूर तालुक्यातील बीड जांबरुंग आदिवासी वाडीतील. या प्रकरणी खोपोली पोलिसांना एकाला अटक केली असून दुसरा आरोपी फरार आहे. बीड जांबरुंग आदिवासी वाडीत विकास पवार यांच्या हळदी कार्यक्रमात १३ मे रोजी रात्री महिला नाचत होत्या. त्यामुळे कपडे काढून नाचू नका, असे अनंता वाघमारे (४०) आणि विलास वाघमारे (३८) या भावांनी मद्यधुंद अवस्थेत नाचणाऱ्या बाळू ऊर्फ बिट्या मधूकर मुकणे (स्टूल आदिवासीवाडी), प्रकाश रमेश पवार यांना सांगितले. त्याचा राग आल्याने बाळू आणि प्रकाश यांनी लोखंडी कालथ्याने वाघमारे भावांना मारहाण केली. यात अनंता वाघमारे (४०) याचा मृत्यू झाला तर विलास वाघमारे जखमी झाला. ही घटना रात्री १ वाजता घडली. त्यानंतर विलास वाघमारे यांच्या तक्रारीनंतर खोपोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सुरुवातीला बाळू आणि प्रकाश यांनी विरोध केला म्हणून विलास वाघमारे यांना मारहाण करायला सुरुवात केली. त्यांचे भांडण सोडवायला अनंता वाघमारे आले. तेव्हा प्रकाश पवारने भात शिजवायचा मोठा कालथा विलास यांच्या डोक्यात आणि अनंता यांच्या छातीवर मारले. यात दोघेही जबर जखमी झाले. दोघांना रिक्षाने खोपोलीतील रुग्णालयात नेत असताना अनंता यांचा वाटेतच मृत्यू झाला. तर विलास वाघमारे यांच्या डोक्याला सहा टाके पडले. या घटनेनंतर बाळू मुकणे आणि प्रकाश पवार फरार झाले. मात्र, बाबू मुकणे याला केळवली रेल्वे स्टेशनातून रात्री ताब्यात घेण्यात आले तर प्रकाश पवार फरार आहे. खोपोली पोलीस ठाण्याचे वपोनी शीतल राऊत, हवालदार सागर शेवते यांनी रुग्णालयात जाऊन रुग्णाची विचारपूस करून घटनेची माहिती घेतली. तर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सकाळी घटनास्थळी भेट पाहणी केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# ईडीने राजकीय नेत्यांची चौकशी करावी



**■विरार :** नालासोपाराच्या विजयलक्ष्मी येथील ४१ इमारती प्रकरणाच्या मनीलॉन्ड्रींग प्रकरणात ईडीने वसई-विरार शहरात १३ ठिकाणी छापे टाकून कोट्यवधीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. यानंतर आता ४१ इमारती प्रकरणातील संबंधित राजकीय नेत्यांची चौकशी करावी, अशी मागणी आगरी सेनेचे महाराष्ट्र उपाध्यक्ष कैलास पाटील यांनी केली आहे. वसई-विरार मधील बेकायदेशीर बांधकाम केलेल्या प्रकरणाची चौकशी मुंबई ईडीने सुरू केली आहे. यामध्ये वसई-विरार परिसरात बेकायदेशीर निवासी आणि व्यावसायिक इमारतींच्या बांधकामाप्रकरणी ईडीने १३ ठिकाणी मोठी कारवाई केली होती. यामध्ये वसई-विरार महानगरपालिकेच्या नियोजन विभागाचे उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्या निवासस्थानी टाकलेल्या छाप्यादरम्यान ८.६ कोटी रुपयांची रोकड आणि २३.२५ कोटी रुपयांचे हिंयांचे दागिने आणि सोने जप्त करण्यात आले. याबाबत अधिक कठोर चौकशी करण्यासाठी ईडीने संबंधित राजकीय नेत्यांना ताब्यात घेणे गरजेचे आहे, अशी मागणी आगरी सेनेने शुक्रवार १६ मे रोजी आगरी सेनेच्या कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करून केली आहे.

# भाईंदरमध्ये वाहतूक पोलिसांची चलन मशीनच चोरली

**■भाईंदर :** वाहतूक पोलिसांची चलन करण्याची मशीन चोरून त्या मशीनद्वारे वेगवेगळ्या वाहनांचे पेंडिंग फाईन भरून शासनाची फसवणूक करणार्याचा शोध घेण्यात आला आहे.

आरोपीला भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. तर आरोपीने मशीनचा वापर करत एकूण ९ जणांच्या वाहनांचा ४९,२०० रुपये दंड रोख स्वरूपात भरणा केला आहे. काशिमिरा वाहतूक शाखेत कार्यरत असणारे पोलीस हवालदार गणेश ताटे रविवारी ९ ते १०.३० च्या सुमारास भाईंदर पश्चिम, मॅक्सेस मॉल समोरील कोटक महिंद्रा बँक जवळ असलेल्या रिक्षा स्टॅन्ड शेजारी त्यांची मोटरसायकल पार्क करून त्यामध्ये काशिमीरा वाहतूक शाखेने दिलेले चलन मशीन डिक्कीमध्ये ठेवून वाहतूक सुरळीत करण्याचे काम करत होते. त्यावेळी एका अज्ञात व्यक्तीने गाडीच्या डिक्कीमधून डिवाइस चोरी केले होते. चोरून नेलेल्या डिवाइसमधून एकूण ९ लोकांच्या वाहनांचे एकूण ४९ हजार २०० रुपये रोख रक्कम दंड स्वरूपात भरणा करण्यात आल्याचे दाखवत दंड भरून घेतला.

मशीन दुचाकीच्या डिक्कीमध्ये नसल्याचे समजताच भाईंदर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार ताटे यांनी गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी गुन्ह्याचे घटना स्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहून तसेच मोबाईल टॉवरचे तांत्रिक विश्लेषण करून संशयित आरोपी बाबत गुप्त बातमीदार यांच्या मार्फत माहिती मिळवून आरोपीचा शोध घेत त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली.त्यानंतर सदरचा गुन्हा त्यानेच केल्याचे निष्पन्न केले. आरोपीचे नाव निधीश संजय पाठक आहे. पोलिसांनी त्याच्याकडून ई-चलन मशीन जप्त करण्यात आले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे पुढील तपास करत आहेत. वाहतूक पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मशीन चोरीला गेल्याने त्यांच्याकडून सदर बाबीचा खुलासा मागवण्यात आल्याचे काशिमीरा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले आहे.

सदरची कारवाई ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद गोवले, अर्जुन जाधव, पोलीस हवालदार सुशील पवार, सलमान पटवे, राजेश श्रीवास्तव, किरण पवार, रामनाथ शिंदे, पोलीस शिपाई राहुल काटकर यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com